# तहसिल कार्यालय, अचलपूर

(आस्थापना शाखा)

दुरध्वनी क्रमांक : 07223-250007
E-mail ID : tah.achalpur@gmail.com
फॅक्स क्रमांक : 07223-250007

क्रं./को. आस्था/जाहिरनामा /कावि- 581 /18

दिनांक :- 06/04/2018

## जाहिरनामा

**विषयः-अचलपूर तालुक्यातील कोतवालांची रिक्त पदे भरण्याबाबत.**

**संदर्भ:-1) मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे पत्र क्र.कक्ष -21/आस्था-6/लि.टं/कावि-277/2018 दिनांक 13/03/2018.**

**2) मा.जिल्हाधिकारी अमरावती यांचे सुधारीत कार्यक्रम पत्र क्र.कक्ष -21/आस्था-6/लि.टं/कावि-313/2018 दिनांक 28/03/2018.**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने सर्व संबंधित उमेदवारांना यानुसार सुचित करण्यात येते कि, अचलपूर तालुक्या अंतर्गत खालील नमुद केलेल्या महसुली साजांमध्ये नावासमोर दर्शविलेल्या जात प्रवर्गानुसार कोतवाल पदांकरीता अर्ज मागविण्यात येत आहे.तरी इच्छुक उमेदवारांनी तहसिल कार्यालय, अचलपूर जि.अमरावती येथे सुटटीचे दिवस वगळुण दि.06.04.2018 ते दि.16.04.2018 या कालावधित कार्यालयीन वेळेत विहीत नमुन्यातील अर्ज मुदतीच्या आत अर्जदाराने सादर करावा.विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केल्या जाणार नाही.याची नोंद घ्यावी.

(अर्जा सोबत खुल्या प्रवर्गाचे जागेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु.300/- आरक्षित जागेकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु. 150/- परीक्षा शुल्क रोख स्वरूपात **तहसिल कार्यालय अचलपूर** येथे अर्ज दाखल करतांना जमा करावे लागेल.)

**(कोतवाल पद नियुक्तीसाठी जात प्रवर्गाचे व महिला आरक्षणासह भरावयाच्या रिक्त जागांचा तपशील खालील प्रमाणे आहे.)**

| अ. क्र | कोतवाल पद भरण्यात येणाऱ्या साझ्याचे नांव | साज्या अंतर्गत गावे | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण | भरावयाची पदसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | वडनेर भु. | वडनेर भु,अंचुज,मोहम्मदपुर,सलाबतपुर,जानोरी | अनु.जाती | - | 1 |
| 2 | बोडी | बोडी, चौसाळा,वळगांव ,चाचोंडी,तुळजापुर जहांगीर | अनु.जाती | महिला | 1 |
| 3 | मल्हारा | मल्हारा,गोंडविहीर,निमकुंड,वझ्झर,काळविट,धुरडघाट | अनु.जमाती | - | 1 |
| 4 | परतवाडा | परतवाडा,नरसाळा,खुदानपुर,औरंगपुर,धोतरखेडा,नरसरी,गोर-खेडा कुंभी | वि.जा.-अ | - | 1 |
| 5 | हिवरा | हिवरा,सांगवी न खेरी,येलकी वासणी बु.वाढोणा जहांगीर | भ.ज.-क | - | 1 |
| 6 | हरम | हरम,शहापुर वडगांव,खंजिरपुर,सालेबाद,अजितपुर,दारापुर,खानापुर न भितखेडा | वि.मा.प्र | - | 1 |
| 7 | कविठा बु. | कविठा बु.धोडगांव,नागरवाडी | इतर मागास वर्ग | - | 1 |
| 8 | काकडा | काकडा,इसापुर,शामपुर | इतर मागास वर्ग | महिला | 1 |
| 9 | सावळी दा. | सावळी दा.,हनवतखेडा,चांदुर जहांगीर,दातुरा,मुरादपुर,वेणी येणी | इतर मागास वर्ग | - | 1 |
| 10 | नायगांव | नायगांव ,चमक बु.,चमक खु.,सुरवाडा,देवरी,खांबोरा,विरखेडा,भितखेडा | इतर मागास वर्ग | महिला | 1 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11 | रासेगांव | रासेगांव,खांजमाबाद | इतर मागास वर्ग | - | 1 |
| 12 | कोल्हा | कोल्हा,नरसिंगपुर,बडगांव खुर्द,तिरमलपुर | इतर मागास वर्ग | - | 1 |
| 13 | बोरगांव पेठ | बोरगांव पेठ,बोरगांव तळणी,रत्नापुर,मेघनाथपुर,रामापुर न बेलज,सांगवी न.निजामपुर | इतर मागास वर्ग | - | 1 |
| 14 | असदपुर | असदपुर,शहापुर न बडगांव,रेंगारवासणी,खानापुर चिंचखेडा,रामापुर जहांगीर | खुला | - | 1 |
| 15 | भिलोना | भिलोना,खांजमानगर,कविठा बु.,कोपरा,पोही | खुला | महिला | 1 |
| 16 | येसुर्णा | येसुर्णा,खेरी,निंभारी | खुला | - | 1 |
| 17 | बाघडोह | बाघडोह,रामापुर (बा),जनुना,गोंडवाघोली मलकापुर | खुला | महिला | 1 |
| 18 | येवता | येवता,शंकरपुर,सावळी बु.,सावळी खु. | भ.ज.-ड | - | 1 |

**कोतवाल पदाकरीता उमेदवार खालील अटीस पात्र असावा :-**

1) दिनांक 16/04/2018 रोजी वय 18 वर्षा पेक्षा कमी व 40 वर्षा पेक्षा जास्त नसावे.
2) अर्जदार संबंधित तलाठी साजा अंतर्गत रहीवाशी असावा.
3) अर्जदार किमान इयत्ता 4 उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
4) अर्जदाराचे चारित्र्य चांगले असावे.
5) आरक्षित पदावर निवड झाल्यानंतर नियुक्तीच्या दिनांकापासुन 6 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

1) अर्ज हा विहीत नमुन्यात असावा.
2) विहीत नमुन्यातील अर्जाच्या प्रती तहसिल कार्यालयात कार्यालयीन दिवशी ,कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील.
3) विहीत नमुन्यातील अर्जाकरीता रू.10/- शुल्क रोख स्वरूपात भरावे लागेल.
4) अर्ज सादर करतांना अर्जास रू.10/- कोर्ट फी स्टॅम्प चिकटविणे आवश्यक राहील.
5) तसेच उमेदवारास पत्रव्यवहार करणे हेतू 2 प्रतित तिकीटासह खाली लिफाफे सादर करावे.
6) अर्ज करावयाच्या पदाकरीता विहीत केलेला परीक्षा शुल्क रोख स्वरूपात जमा करावा लागेल.

**कोतवाल पदाकरीता अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे :-**

1) ईयत्ता 4 थी उत्तीर्ण गुणपत्रीका किंवा महत्तम प्राप्त शैक्षणिक गुणवत्ता दर्शविणारी गुणपत्रीका.
2) शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र.
3) साजातील रहीवाशी असल्याबाबत संबंधित तलाठी / ग्रामसेवक यांचा दाखला.
4) आरक्षित पदाचे अर्जाकरीता जातीचे प्रमाणपत्र किंवा जात वैधता प्रमाणपत्र आणि इतर मागासवर्गाकरीता उन्नत गटात मोडत नसल्याबाबत प्रमाणपत्र.
5) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र.
6) महिला समांतर आरक्षण पदाकरीता सक्षम अधिकारी यांनी जारी केलेले उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र.

**कोतवाल पदाकरीता निवडीची पध्दत :-**

1) कोतवाल पदाकरीता निवड ही लेखी व तोंडी परिक्षेच्या आधारे प्राप्त एकुण गुणाच्या आधारावर करण्यात येईल.
2) लेखी परिक्षा बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाची असेल.
3) प्रश्नपत्रीका 75 प्रश्नांची असेल .प्रत्येक प्रश्नास 1 गुण असेल.

4) तोंडी परीक्षा 25 गुणांची असेल.

5) परीक्षेची वेळ ,स्थळ व दिनांक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

**परिक्षेचा अभ्यासक्रम :-**

1) लेखी परीक्षा तपशील- सर्वसाधारण

(मराठी भाषा - 25 प्रश्न, सामान्य ज्ञान - 25 प्रश्न,सामान्य बुध्दीमत्ता व अंकगणित - 25 प्रश्न)

इ. यावर आधारीत साधारणत: वर्ग 4 स्तरावरील प्रश्न.

2)तोंडी परिक्षा - 25 गुण

**कोतवाल पदभरती करीता कालबध्द कार्यक्रम :-**

| अ.क्र | कालबध्द कार्यक्रमानुसार करावयाची कार्यवाही | कालावधी |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्दी करणे | 06/04/2018 |
| 2 | उमेदवाराचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | 16/04/2018 |
| 3 | पात्र/अपात्र अर्जाची छाननी करून यादी प्रसिध्द करणे | 18/04/2018 |
| 4 | आक्षेप मागविणे | 21/04/2018 |
| 5 | आक्षेप निकाली काढुन परीक्षेसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | 23/04/2018 |
| 6 | उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविणे | 26/04/2018 |
| 7 | लेखी परीक्षा घेणे | 29/04/2018 |
| 8 | तोंडी मुलाखत घेणे | 02/05/2018 |
| 9 | निकाल जाहिर करणे व नियुक्ती पत्र पाठविणे | 06/05/2018 |

कोतवाल भरती संदर्भात काही वाद निर्माण झाल्यास त्या बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार तसेच वेळापत्रकात बदल करण्याचे अधिकार **निवड समिती** यांचे राहतील.तसेच पात्रतेच्या दृष्टीकोनातुन अंतिम निवड करण्याचे अधिकार **निवड समिती** तथा नियुक्ती प्राधिकारी यांचे कडे राखुन ठेवण्यात येत आहे.

**दि:-06.04.2018**

**अध्यक्ष,**
**तालुका कोतवाल निवड समिती-2018 तथा**
**उपविभागीय अधिकारी, अचलपूर**

**सदस्य सचिव,**
**तालुका कोतवाल निवड समिती-2018 तथा**
**तहसिलदार, अचलपूर**

**प्रतिलीपी :-**

1. गटविकास अधिकारी.पं.सं. अचलपूर यांना माहिती करीता रवाना.आपण सदरचा जाहिरनामा पं.सं.नोटीस बोर्डावर संबंधित कडुन प्रसिध्द करून अहवाल या कार्यालयास पाठवावा ही विनंती.
2. तलाठी ----------- यांना कळविण्यात येते कि,यांनी सदरचा जाहिरनामा गावामध्ये नोटीस बोर्डावर लावुन मुनादीव्दारे स्थानिक लोकांना माहिती दयावी.
3. सचिव ग्राम पंचायत ------------ यांना माहिती करीता रवाना.आपण सदरचा जाहिरनामा ग्रा.पं.नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून अहवाल सादर करावा.
4. तहसिल जमादार तहसिल कार्यालय अचलपूर/प्रेषक लिपीक यांना सदर जाहिरनामा कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करावा व तसा अहवाल सादर करावा.

**अध्यक्ष,**
**तालुका कोतवाल निवड समिती-2018 तथा**
**उपविभागीय अधिकारी, अचलपूर**

**सदस्य सचिव,**
**तालुका कोतवाल निवड समिती-2018 तथा**
**तहसिलदार, अचलपूर**